महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्र. १४४२(२(२)/२०१९/तेरा-अ दिनांक : २७ ऑगस्ट, २०२१.

महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब (मुख्य) परीक्षा - २०१९
सहायक कक्ष अधिकारी पदाचा सुधारित अंतिम निकाल
जाहिरात क्र. ०१/२०१९ व अधिसूचना क्र. १०/२०१९

## -: सुधारित अंतिम निकालाची घोषणा :-

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दिनांक २८ जुलै, २०१९ व दिनांक २५ ऑगस्ट, २०१९ रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब (मुख्य) परीक्षा - २०१९ चा सहायक कक्ष अधिकारी पदाचा अंतिम निकाल दिनांक १७ मार्च, २०२० रोजी जाहीर करण्यात आला होता. दरम्यानच्या कालावधीत मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गाच्या आरक्षणाच्या अनुषंगाने दाखल सिव्हिल अपील क्रमांक ३१२३/२०२० या न्यायिक प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाकडून दिनांक ५ मे, २०२१ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयानुसार शासन सेवेतील सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गाचे आरक्षण रद्दबातल ठरविण्यात आले आहे. सदर न्यायनिर्णयाच्या अनुषंगाने शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीसीसी-२०२०/प्र.क्र.३२०/१६-ब, दिनांक ५ जुलै, २०२१ व क्र.बीसीसी-२०२१/प्र.क्र.३६०/१६-ब, दिनांक १५ जुलै, २०२१ अन्वये भरती प्रक्रिया राबविण्यासंदर्भात शासनाकडून कार्यपद्धती विहित करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गाकरीता आरक्षित पदे अराखीव पदांमध्ये रुपांतरीत करुन महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब (मुख्य) परीक्षा - २०१९ चा सहायक कक्ष अधिकारी पदाचा सुधारित अंतिम निकाल संबंधित उमेदवारांनी अर्जात केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने त्यांची पात्रता शासन स्तरावर मुळ प्रमाणपत्रांवरुन तपासण्याच्या अधीन राहुन दिनांक २७ ऑगस्ट, २०२१ रोजी जाहीर करण्यात आला आहे. सुधारित अंतिम निकालानुसार सदर मुख्य परीक्षेत शिफारसपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या बैठक क्रमाकांसह याद्या व प्रस्तुत परीक्षेची गुणांची सीमारेषा उमेदवारांच्या माहितीसाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आली आहे.

**२.** प्रस्तुत सुधारित अंतिम निकालानुसार नियुक्तीस शिफारसपात्र ठरलेल्या सर्व उमेदवारांच्या शिफारशी विषयांकित परीक्षेच्या आवेदनपत्रातील दाव्यांच्या पृष्ठर्थ नियुक्तीच्यावेळी त्यांची पात्रता मूळ प्रमाणपत्रावरुन तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून करण्यात येत आहे. उमेदवारांनी आवेदनपत्रात दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अथवा आवेदनपत्रातील दाव्यानुसार आवश्यक प्रमाणपत्रांची पूर्तता नियुक्तीच्यावेळी न केल्यास, अधिसूचनेतील तरतुदीनुसार दावे तपासतांना वा अन्य कारणामुळे अपात्र ठरणाऱ्या संबंधित उमेदवारांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

**३.** दिव्यांगांसाठी राखीव असलेल्या पदावर शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांची प्रमाणपत्रे वैद्यकिय मंडळाकडून तपासून घेण्याच्या अधीन राहून त्यांची शासनाकडे शिफारस करण्यात येत आहे. तसेच सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय,

क्र.अपंग-१००३/प्र.क्र.१२७/ २००३/१६-अ, दिनांक ६ मे, २००४ मधील बाब क्र. (६) नुसार त्यांच्या नेमणुकीपूर्वी उमेदवार संबंधित पदावर नियुक्तीसाठी सक्षम आहे किंवा नाही याची देखील वैद्यकिय मंडळाकडून तपासणी केल्यानंतर ते नेमणुकीस पात्र ठरतील. दिव्यांगांसाठी राखीव असलेल्या पदावर शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांनी सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय, क्र.अप्रकि-२०१२/प्र.क्र.२९७/ आरोग्य-६, दिनांक ६ ऑक्टोबर, २०१२ मधील आदेशानुसार SADM या नवीन संगणक प्रणालीव्दारे वितरीत करण्यात आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. तसेच दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या आधारे सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र.दिव्यांग-२०१८/प्र.क्र.११४/१६-अ, दिनांक २९ मे, २०१९ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार आरक्षणासंदर्भातील कार्यवाही करण्यात येईल.

**४.** प्रस्तुत परीक्षेचा सुधारित अंतिम निकाल समांतर आरक्षणाच्या मुद्यांसंदर्भात तसेच अन्य मुद्यांसंदर्भात विविध मा.न्यायालयात/ मा.न्यायधिकरणात दाखल न्यायिक प्रकरणातील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

**५.** सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गाच्या ज्या उमेदवारांनी अराखीव प्रवर्गासाठी विहित करण्यात आलेली वयोमर्यादा ओलांडली असेल त्यांनी वयोमर्यादेतील सवलतीकरीता तद्अनुषंगिक प्रमाणपत्र नियुक्तीच्यावेळी सादर करणे अनिवार्य राहील.

**६.** सदर पदाच्या निकालात, गुणवत्ता यादीत तसेच शिफारस यादीत उमेदवारांचा सयुंक्त प्रश्नपत्रिका क्र.१ शी निगडित बैठक क्रमांक व प्रश्नपत्रिका क्र.२ शी निगडित बैठक क्रमांक हे दोन्ही बैठक क्रमांक नमूद करण्यात आले आहेत.

**७.** विषयांकित परीक्षेच्या गुणवत्तायादीमधील उमेदवारांची गुणवत्ता व पात्रता उमेदवारांनी अर्जात केलेले दावे विचारात घेऊन निश्चित करण्यात आली आहे. शिफारसपात्र उमेदवार वगळता अन्य उमेदवारांची गुणवत्ता व पात्रता ही अर्जातील त्यांच्या दाव्यांच्या आधारे तपासण्याच्या अधीन राहून सदर गुणवत्ता यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

**८.** सदर परीक्षेमध्ये **श्री. काळे रोहीत मधुकर,** बैठक क्रमांक **MB001205** हे राज्यातून **प्रथम** आले आहेत. तसेच मागासवर्गवारीतून **श्री. मदने शुभम राजेश**, बैठक क्रमांक **MB001210** हे **प्रथम** आले आहेत व महिला वर्गवारीतून **श्रीमती अनुसे शमा गणपत,** बैठक क्रमांक **MB002196** ह्या राज्यात **प्रथम** आल्या आहेत.

उप सचिव (परीक्षा-१)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.